# मुंबई विद्यापीठ

**<u>एएक्युए/आयसीडी/२०२०–२१/०३</u>**

**<u>परिपत्रक:</u>**

विद्यापीठाचे विविध विभाग/केंद्र/संस्था येथील संचालक/विभागप्रमुख/समन्वयक, प्राचार्य, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, समन्वयक, रत्नागिरी/ठाणे उपकेंद्र, स्कूल ऑफ इंजिनियरिंग ॲंड अप्लाइड सायन्सेस, कल्याण, प्रभारी संचालक विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श महाविद्यालय, अंबडवे आणि विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी आदर्श महाविद्यालय, तळेरे, प्रभारी संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र यांना कळविण्यात येते की, मुख्य सचिव महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे शासन आदेश क्र.कोरोना–२०२१/प्र.क्र.३६६/आ–५ दिनांक २६ ऑक्टोबर, २०२१ आपल्या माहितीस्तव सोबत जोडले आहे. सदर शासन आदेशाद्वारे सार्वजनिक आरोग्य विभागाने ब्रेक द चेन अंतर्गत– राज्यातील सर्व शासकीय/निमशासकीय व खाजगी व औद्योगिक आस्थापनांमध्ये मास्कचा वापर बंधनकारक करणे तसेच कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण तातडीने पूर्ण करण्याबाबत कळविले आहे.

या अनुषंगाने आपणांस सुचित करण्यात येते की, कोविड–१९ बाधेच्या लाटेची द्विरूक्ती टाळण्यासाठी मुंबई विद्यापीठ व विद्यापीठ परिसराच्या आवारात वावरणाऱ्या अभ्यागत/कर्मचारी/अधिकारी यांना मास्कचा वापर अनिवार्य करण्यात येत आहे. तसेच दिनांक २६ ऑक्टोबर, २०२१ नुसार निर्गमित करण्यात आलेल्या शासन आदेशांचे तंतोतंत पालन करण्यात यावे, याची नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखाली असलेल्या संबंधित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या निदर्शनास आणावे.

(सुधीर पुराणिक)
कुलसचिव

मुंबई – ४०००३२
१ नोव्हेंबर, २०२१

प्रति,
विद्यापीठाचे विविध विभाग/केंद्र/संस्था येथील संचालक/विभागप्रमुख/समन्वयक, प्राचार्य, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, समन्वयक, रत्नागिरी/ठाणे उपकेंद्र, स्कूल ऑफ इंजिनियरिंग ॲंड अप्लाइड सायन्सेस, कल्याण, मुंबई विद्यापीठ ग्रंथपाल, संचालक विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अंबडवे आणि विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे, प्रभारी संचालक, केंद्र.

***

कृ.मा.पा



Scanned with CamScanner